# जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४

खालील अटी पूर्ण करणाऱ्या शिक्षकांनी आपले प्रस्ताव या कार्यालयाकडे दिनांक १५/२/२०२५ रोजी पर्यत खालील लिंकवर क्लीक करून भरावेत.

अटी :-

१. मुख्याध्यापक/शिक्षक यांची सेवा किमान १५ वर्षे झालेली असावी.
२. ज्या शिक्षकांना पुर्वी जिल्हा /राज्य स्तरावरील पुरस्कार मिळालेले आहेत.अशा शिक्षकांनीप्रस्ताव पाठवू नयेत.
३. संबंधित शिक्षकावर कारवाई केलेली नसावी..
४. शिक्षकांनी आपली सामाजिक/शालेय व राष्ट्रीय कार्य, समाजातील लोकप्रियता प्रामुख्याने विचारात घेवून शैक्षणिक, सामाजिक दर्जा तसेच सामाजिक समता, समरसता, स्त्री पुरष समानता याबाबत संवेदनशीलता व त्यासाठी केलेले विशेष प्रयत्न याचा विचारकरून आपला प्रस्ताव सादर करावा.
५. संबंधीत शिक्षक/मुख्याध्यापक यांचे मागील ५ वर्षात गोपनीय अहवाल प्रतिकूल नसावेत.
६. सादरीकरणावेळी ओळखपत्र साईजचे २ फोटो प्रती जोडून पाठवावेत.
७. संबंधित शिक्षकांचा/मुख्याध्यापकांचा पुर्व इतिहास व चारित्र्य पडताळणीबाबत, मा.पोलीस अधिक्षक यांचा दाखला जोडणेत यावा.
८. शिक्षक/मुख्याध्यापक अध्यापन करित असलेल्या वर्ग/विषय यामध्ये विद्यार्थी संपादणूकीसाठी वर्गस्तरावर प्रत्यक्ष चाचणी दुसऱ्या तालुक्यातील शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या पथकाद्वारे घेतली जाईल.
९. वरील प्रमाणे आपला प्रस्ताव तयार करून सोबतच्या पोर्टलवर प्रत्येक टॅबमध्ये योग्य ती कागदपत्रांची स्कॅन केलेली pdf प्रत upload करावी. तसेच सदर प्रस्ताव बायडिंग करुन अंतिम दिनांकापर्यत जिल्हा परिषदेकडे सादर करावा.
१०. मुद्दयानुसार प्रस्ताव सादर करण्यात यावा.अनावश्यक कागदपत्रे, फोटो, मा.पदाधिकारी यांचे शिफारस पत्र जोडण्यात येवू नयेत.
११. जिल्हास्तरावर प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावाची पडताळणी व मुलाखती करण्यासाठीसमिती स्थापन केली जाईल. सदर समिती सर्व प्रस्तावांची ऑनलाईन छाननी करून सादरीकरणासाठी शिक्षकांची निवड करेल. सादरीकरणासाठी निवड केलेल्या शिक्षकांना PPT द्वारे ऑनलाईन स्वरूपात सादरीकरण करावे लागेल. सादरीकरणासाठी १० पैकी निकषानुसार गुण दिले जातील.
१२. प्रस्तावासोबत खाते कारवाई प्रस्तावित अथवा सुरू नसल्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करावे.
१३. संदर्भीय परिपत्रकानुसार आदर्श शिक्षक पुरस्काराबाबत जिल्हा परिषद जे अंतिम धोरण निश्चित करेल त्यास आमची हरकत असणार नाही, असे हमीपत्र पुरस्कार प्रस्तावासोबत शिक्षकांनी सादर करणे आवश्यक आहे.

**लिंक-** https://neurologic.in/DTA/

प्रस्ताव सादर करण्यासाठी वरच्या लिंकवर भेट द्या